| | | | |
|---|---|---|---|
| MHSN060023512024 | दाखल तारीख | : | ०४/१०/२०२४ |
| | नोंद तारिख | : | ०५/१०/२०२४ |
| | निकाल तारीख | : | २५/०३/२०२६ |
| | कालावधी | : | ०१ व ०५ म २१ दि |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.३) मिरज, ता.मिरज, जि.सांगली यांच्या न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी श्रीमती पी. डी. गायकवाड)

म.सं.कौ.हिं.का.अर्ज नं.८३/२०२४ **निशाणी क्र.१४**

| | | |
|---|---|---|
| १. | सौ.सना मियालाल गरगरे,<br>वय – ३० वर्षे, व्यवसाय– घरकाम, | |
| २. | कु.फैज मियालाल गरगरे,<br>वय – १० वर्षे, व्यवसाय– शिक्षण, | |
| ३. | कु.तस्मिया मियालाल गरगरे,<br>वय – ०८ वर्षे, व्यवसाय– शिक्षण, | **व्यथित व्यक्ती / अर्जदार** |
| | अर्जदार क्र.२ व ३ यांची अ.पा.क. आई म्हणून अर्जदार क्र.१.<br>अर्जदार क्र.१ ते ३ रा. व्दारा– श्री.अमजद रफिक शेख, टाकळी हद्द, अलिशान कॉलनी, सुभाषनगर, मिरज, ता.मिरज, जि.सांगली. | |
| | **विरुध्द** | |
| १. | श्री. मियालाल बापूसाब गरगरे,<br>वय – ३४ वर्षे, व्यवसाय – खाजगी नोकरी, | |

| | | |
|---|---|---|
| २. | श्री. आप्पालाल बापूसाब गरगरे,<br>वय – ३३ वर्षे, व्यवसाय – सेंट्रींगकाम. | |
| ३. | सौ.हिना आप्पालाल गरगरे,<br>वय – ३० वर्षे, धंदा – घरकाम. | |
| ४. | श्री.बंडूलाल बापूसाब गरगरे,<br>वय – ३८ वर्षे, धंदा – खाजगी नोकरी. | |
| ५. | सौ.आसमा बंडूलाल गरगरे,<br>वय – ३३ वर्षे, धंदा – घरकाम. | **जाबदार.** |
| ६. | श्री. घुडूलाल बापूसाब गरगरे,<br>वय – ३५ वर्षे, धंदा – खाजगी नोकरी. | |
| ७. | सौ.मिनाज घुडूलाल गरगरे,<br>वय – ४० वर्षे, धंदा – घरकाम. | |
| | सर्वजण रा.लोंढे हॉस्पीटलजवळ, भोने माळ, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर. | |

---

अर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ – श्री.यु.एस.सौदागर.

जाबदारविरुध्द एकतर्फी आदेश.

---

## न्यायनिर्णय

(घोषित तारीख : २५/०३/२०२६)

**१.** अर्जदाराने जाबदार यांचेविरुध्द प्रस्तुत अर्ज महिलांचा घरगुती जुलमांपासून संरक्षण करण्यासंबंधीचे अधिनियम, २००५ (यापुढे संक्षेपाकरिता 'अधिनियम' असा उल्लेख करण्यात येईल) च्या कलम अन्वये दाखल करुन त्याअंतर्गत

विविध मागण्या मंजूर होण्याची विनंती केली आहे.

**अर्जदाराचे अर्जातील कथन थोडक्यात असे की,**

२. अर्जदार नं. १ व जाबदार नं. १ यांचा विवाह मुस्लीम धर्माप्रमाणे तसेच मुस्लीम धर्माच्या चालीरिती व रिवाजानुसार दि. १२/०५/२०१३ रोजी एन.बी हॉल, कमाल मजीद समोर, बुधवारपेठ, मिरज येथे संपन्न झालेला आहे. सदर लग्नाचा संपुर्ण खर्च अर्जदार नं. १ यांचे आई वडीलांनी केलेला असुन सदर लग्नामध्ये अर्जदार नं. १ यांच्या आई वडीलांनी अर्जदार नं. १ यांना ५ ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र, ४ ग्रॅम सोन्याची अंगठी, ६ ग्रॅम सोन्याचे कानातील टॉप घातलेले होते व सर्व प्रकारचे संसार उपयोगी वस्तु दिलेल्या होत्या. सदर लग्न संबंधातून अर्जदार नं. १ व जाबदार नं. १ यांना कु. फैज हा मुलगा व कु. तस्मिया ही मुलगी अशी दोन अपत्ये झालेली आहेत. अर्जदार नं. १ व जाबदार नं. १ यांच्या लग्नाच्या दुसऱ्या महिन्यापासुन जाबदार व त्यांच्या घरातील लोक हे अर्जदार नं. १ हिच्याशी चांगले वागत नव्हते. जाबदार नं. १ हे अर्जदार नं. १ बरोबर काहीही कारण नसताना किरकोळ कारणावरुन भांडण काढत. तसेच जाबदार नं. १ यांना दारुचे मोठे व्यसन होते हे जाबदारांनी अर्जदार नं. १ व त्यांच्या घरातील लोकांच्यापासून लपवून ठेवून सदरचे लग्न केले. जाबदार नं. १ हे दारुच्या व्यसनाच्या आहारी जावून दररोज दारु असत तसेच रात्री अपरात्री उशिरापर्यंत पाटर्या करीत असत व रात्री १२.०० ते १.०० वाजता घरी येत असत व घरी आल्यानंतर अर्जदार नं. १ हिच्यासोबत विनाकारण किरकोळ कारणावरुन भांडण काढून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करुन मारहाण करीत असत.

३. त्यानंतर अर्जदार नं. १ यांना दिवस गेले व त्यावेळी जाबदार नं. १ हे अर्जदार नं. १ हिला कोणत्याही दवाखान्यामध्ये दाखविणेस घेवून गेले नाहीत. जाबदार नं.१ हे गरोदरपणात अर्जदार नं.१ यांचेवर कोणतेही औषधोपचार करीत नसल्याने

नाईलाजस्तव अर्जदार नं.१ हिने आईवडीलांना फोन करुन बोलावून घेऊन दवाखान्यात दाखविणेस जात असे. त्याबाबत अर्जदार नं. १ हिच्या आईवडीलांनी जाबदार नं. १ यांना काही विचारले तर जाबदार नं. १ हे अर्जदार नं. १ व त्यांच्या आईवडीलांना ''माझ्याकडे तिला दवाखान्यात दाखवायला वेळ नाही'' असे सांगत असे. त्यानंतर अर्जदार नं.१ ही सातवा महिना सुरु असताना बाळंतपणासाठी माहेरी मिरज येथे आली व दि. ०३/१०/२०१४ रोजी सिव्हील हॉस्पीटल मिरज येथे अर्जदार नं. १ हिला मुलगा झाला. जाबदार नं.१ व त्यांच्या घरातील लोक हे अर्जदार हिला व मुलाला पाहणेस दवाखान्यात आले नाहीत तसेच अर्जदार नं.१ व मुलाची कोणतीही विचारपूस व चौकशी देखील केली नाही. अर्जदार नं.१ हिला मुलगा झाल्याचा जाबदारांना आनंद झालेला नव्हता. जाबदार नं. १ यांना मुलगी हवी होती. त्यानंतर सुमारे दीड महिन्यांनी अर्जदार नं. १ ही जाबदार नं. १ यांचेकडे नांदण्यासाठी गेली. सासरी गेल्यानंतर जाबदार नं. १ व त्याच्या घरच्या लोकांच्या वागण्यामध्ये लक्षणीय बदल झालेचे दिसुन आले. अर्जदार नं. १ हिला मुलगी झाली नाही म्हणुन जाबदार नं. १ व त्यांच्या घरातील लोक नेहमी टोमणे मारत असे व जाबदार नं. १ हे अर्जदारास विनाकारण दारू पिऊन येवून मानसिक व शारीरीक त्रास देत असत. जाबदार नं.१ यांचे सदरच्या कृत्यास त्यांच्या भावाची पुर्ण साथ होती व त्यांचे सांगणेवरुन जाबदार नं.१ हे अर्जदार नं. १ हिला जास्तच शारिरीक व मानसिक त्रास देत असत. परंतू अर्जदार नं. १ यांचे जाबदार नं. १ वर प्रेम व आपुलकी असलेने व मुलाचे भविष्याकरिता अर्जदार नं. १ ही सर्वांची मर्जी राखुन जाबदार नं.१ बरोबर व्यवस्थित संसार करीत होती. त्यानंतर अर्जदार नं. १ ही जाबदार नं. १ यांचेपासुन पुन्हा गरोदर राहिली. अर्जदार न. १ ही गरोदर असताना सर्व जाबदार अर्जदार नं. १ हिला "आता तुला मुलगीच झालीच पाहीजे नाहीतर आम्ही तुला घटस्फोट देवुन जाबदार नं. १ याचे दुसरा लग्न करणार" असे म्हणुन वारंवार छळ करु लागले. जाबदार नं. १ व त्यांच्या घरातील लोक हे अर्जदार नं. १ हिला किरकोळ कारणावरुन भांडण काढून, घाणेरड्या शिव्या देवून माराहाण करीत असे. अशा परिस्थितीत देखील अर्जदार

नं.१ या जाबदार नं. १ यांचे बरोबर संसार करीत होती. जाबदार नं. १ व त्यांच्या घरातील लोकांचे जाचहट व छळामुळे अर्जदार नं. १ यांची तब्येत खालावत गेली. त्यामुळे अर्जदार ही दुसऱ्या बाळंतपणासाठी देखील माहेरी आली.

४. दिनांक ०६/११/२०१६ रोजी अर्जदार नं. १ मुलगी झाली. अर्जदार नं.१ हिच्या डिलीव्हरीकरिता अर्जदार नं.१ यांच्या माहेरीची परिस्थीती चांगली नसताना देखील दवाखान्याचा संपुर्ण खर्च अर्जदार नं.१ हिच्या आई वडीलांनी पैसे उधार घेवून भागविले. जाबदार नं. १ हे अर्जदार नं. १ यांचेशी नांदणेस येणेबाबत बरोबर सुमारे चार महिने काहीही बोलले नाही व साधी चौकशी देखील केले नाही. त्यामुळे अर्जदाराच्या आईवडीलांनी अर्जदार नं.१ हिला नांदविण्यास घेवुन जात नसल्याने सदरबाबत लग्नातील मध्यस्थी लोकांना त्याची कल्पना दिली. त्यानंतर लग्नातील मध्यस्थी लोकांनी जाबदार नं.१ व त्यांच्या घरच्या लोकांना बोलावून घेवून चौकशी केली असता ते उडवा–उडवीचे उत्तरे देवु लागले. त्यानंतर जाबदार नं. १ व त्यांचे घरातील लोक आपली चुक मान्य करुन अर्जदार नं.१ नांदणेस घेवुन गेले. सुरवातीचे काही दिवस जाबदार नं.१ यांनी अर्जदार नं. १ हिला व्यवस्थित नांदविले व त्यानंतर जाबदार नं.१ हे पुर्वीप्रमाणेच वागू लागले. मुले लहान असताना देखील जाबदार नं. ३, ५ व ७ हे घरातील कोणतेही काम न करता सर्व कामे अर्जदार नं. १ हिलाच करणेस सांगत असे. तसेच कोणतेही कारण नसताना अर्जदार नं. १ यांना ऐनकेन प्रकारे त्रास देत असे. तसेच जाबदार नं.१ यांनी अर्जदार नं.१ यांना घरासाठी लागणारे संसारोपयोगी साहित्य व कपडेलत्ता तसेच खानपानाची विचारपूस न करता पती म्हणून कोणतेही प्रकराची जबाबदारी अथवा कर्तव्य पार पाडत नव्हते. त्यानंतर जाबदार नं. १ हे अर्जदार हिला माहेरहून दुचाकी घेण्यासाठी र.रु. ५०,०००/– घेवुन ये म्हणुन शिवीगाळ करुन मारहाण करु लागले. त्यांच्या सदरच्या कृत्यास जाबदार नं. २ ते ७ यांची साथ होती व त्यांचे शिकवणी वरुन जाबदार नं. १ हे अर्जदार हिला त्रास देत असत.

५. त्यानंतर जाबदार यांनी अर्जदार नं.१ हिला सतत टोमणे मारणे पैसे घेवून व सोने घेऊन येणेबाबत बोलून मानसिक व शारीरीक त्रास देणेस सुरुवात केली. जाबदार हे अर्जदार नं. १ हे अर्जदार नं. १ हिला अंगावर धावून येवून मारहाण करीत होते. अर्जदार नं.१ यांना सदरचा त्रास फार असहाय्य झाल्याने त्यांनी दि. २५/०६/२०२२ रोजी जाबदार नं. १ विरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी येथे तक्रार दिली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीसांनी जाबदार नं.१ यांचेविरुध्द एन.सी.आर नं. ४५०/२०२२ अन्वये भारतीय दंड संहीताचे कलम ३२३, ५०४ अन्वये गुन्हा नोंद केला. त्यावेळी पोलीसांनी जाबदार नं.१ यांना समज देवुन त्याचे विरुध्द प्रतिबंधक कारवाई करुन सोडून दिले. त्यानंतर जाबदार नं.१ हे अर्जदार नं.१ हिला सदर तक्रारीचा राग मनात धरून मारहाण करुन अर्जदार नं.१ यांचेशी बोलत नसे व अर्जदार नं. १ यांनी घरी केलेले जेवणसुध्दा जेवत नसे, तसेच अर्जदारांची कोणतीही विचारपुस करत नसे. उलट अर्जदार नं. १ यांचे पतीवर असलेल्या प्रेमाखातर जाबदार नं. १ यांची विचारपूस केली असता जाबदार नं. १ हे "तु माझ्याशी बोललीसच का, मी कोठेही बाहेर खाईन मला तु अजिबात विचारायचे नाही" असे बोलून माराहाण करीत होते. त्यानंतर अर्जदार यांनी जाबदार नं. १ यांचे सततच्या गैरकृत्याला कंटाळून मा. पोलिस अधिक्षक कार्यालय महिला कक्ष, सांगली येथे जाबदार नं. १ यांचेविरुध्द तक्रार दिली. त्यानंतर सदरच्या तक्रारीच्या अनुषंगीक चौकशीवेळी पोलीसांनी अर्जदार नं.१ व जाबदार नं.१ यांचेमध्ये समझोता घडवुन आणला व जाबदार नं.१ यांनी अर्जदार नं.१ यांना नांदविण्याची तयारी दर्शविलेने व कसल्याही प्रकारचा त्रास देणार नसल्याबाबत लिहुन दिलेने सदरची तक्रार अर्जदार नं.१ यांनी मागे घेतली. त्यामुळे सदरचे तक्रार दि. ३०/०७/२०२२ रोजी निकाली काढून सदरच्या गैरकृत्याबाबत जाबदार नं. १ यांना मा.पोलीस अधिक्षक कार्यालय महिला कक्ष, सांगली यांचेकडून समज देणेत आली.

६. त्यानंतर एक महिना जाबदार नं.१ हे अर्जदार नं.१ हिचेशी चांगले वागले व त्यानंतर पुन्हा पुर्वीसारखे कृत्य करु लागले. जाबदार नं.१ हे बाहेरख्याली होऊन

परस्त्रीच्या नादाला लागले. जाबदार नं.१ हे कामावरुन रात्री घरी आल्यानंतर तासनतास कोणाशीतरी फोनवरुन बोलत असत. याबाबत अर्जदार नं.१ यांनी विचारले असता जाबदार हे मित्रासोबत बोलत आहे असे कारण सांगत असत. अर्जदार नं. १ यांनी ''मित्राबरोबर रात्री काय बोलता व तुम्ही फोन आल्यानंतर घराच्या बाहेर जावून तासनतास काय बोलता व मोबाईल फोनवर कुणाचा कॉल आहे'' असे विचारलेवर जाबदार हे अर्जदार नं.१ हिला शिवीगाळ करुन मारहाण करीत असे व मोबाईलला लॉक घालून ठेवत असे. जुन २०२२ मध्ये अर्जदार नं.१ यांनी जाबदार नं.१ यांचा मोबाईल चेक केला असता जाबदार नं.१ हे महिलेसोबत कॉलवर बोलत असलेले अर्जदार नं.१ यांच्या लक्षात आले. सदरची व्यक्ती कोण आहे याची माहिती अर्जदार नं.१ यांनी काढली असता सदरची महिला जाबदार नं.१ च्या कामाच्या ठिकाणी म्हणजेच बेकरीमध्ये काम करते असे समजुन आले. त्याबाबत अर्जदार नं.१ यांनी जाबदार यांना विचारले असता काहीही न बोलता जाबदारानी अर्जदार नं. १ यांना "तु मोबाईलला हात का लावलीस" असे म्हणून बेदम मारहाण केली. त्यानंतर जाबदार हे अर्जदार नं.१ हिला घरखर्चासाठी र.रु. १०,०००/- माहेरुन घेऊन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करु लागले. त्यानंतर दि. १३/०९/२०२२ रोजी पुन्हा जाबदार हे दुसऱ्या महिलेशी संपर्क करुन तिला भेटत असल्याचे अर्जदार नं.१ यांनी पाहिले व त्याची विचारणा अर्जदार नं. १ यांनी त्यांना केली असता जाबदार नं. १ हे अर्जदार नं. १ हिला "मी कोणत्याही महिलेशी बोलेन किंवा भेटेन तु विचारणारी कोण, मी जसे सांगेन तसेच तु राहायचं अन्यथा तुला मारुन टाकेन" असे बोलून अर्जदार नं. १ हिला जबर माराहाण केल्याने अर्जदार नं. १ हिने शिवाजी नगर पोलीस ठाणे, इचलकरंजी येथे जाबदार विरुध्द तक्रार दिली व त्याप्रमाणे पोलीसांनी जाबदार नं. १ विरुध्द दिनांक १३/०९/२०२२ रोजी एन.सी.आर.नं. ५७८/ २०२२ अन्वये भा.दं.सं. कलम ३२३, ५०४ व ५०६ अन्वये गुन्हा दाखल केला. त्यानंतर अर्जदार नं.१ या मुलांसहीत माहेरी निघुन आल्या व माहेरी आल्यानंतर त्यांचे असे लक्षात आले की पोलीसांनी त्यांचे जबाबाप्रमाणे जाबदार यांचे वर गुन्हा नोंद केलेला नाही. त्यामुळे अर्जदार नं.१ या

दि. १७/०९/२०२२ रोजी पुन्हा शिवाजीनगर पोलीस ठाणेमध्ये गेल्या व वरिष्ठ पोलीसांना भेटून सर्व ती हकीकत पोलीसांना सांगितली व त्याप्रमाणे पोलीसांनी सर्व जाबदार यांचे विरुध्द एफ. आय. आर नं. ४८३/२०२२ अन्वये भा.दं.सं. चे कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६ व ३४ अन्वये गुन्हा नोंद केला. त्यांनतर अर्जदार नं. १ मुलासहीत माहेरी निघून आल्या. अर्जदार माहेरी राहत असताना जाबदार नं.१ यांनी अर्जदार यांचे चौकशी केली नाही. त्यानंतर अर्जदार नं.१ व जाबदार नं.१ यांचे घरातील लोक व समाजातील प्रतिष्ठित लोक यांचे आपसात बैठक झाली. सदर बैठकीमध्ये जाबदार नं.१ यांनी अर्जदार यांना व्यवस्थित नांदविणेचे तसेच कोणत्याही प्रकारे त्रास न देण्याचे ग्वाही दिलेने अर्जदार नं. १ या मुलासहित नांदणेस गेल्या. त्यानंतर पोलीसांनी जाबदारविरुध्द मे. कोर्टात दोषारोप पत्र पाठवून दिले व इचलकरंजी येथील न्यायालयात सुनावणीच्या तारखा सुरु झाल्या. अर्जदार यांची जाबदार यांचेबरोबर आपसांत तडजोड झाल्यामुळे दि. ११/०३/२०२४ रोजी न्यायालयाचे अर्जदार नं.१ यांचे साक्षीवरुन जाबदारांची र्निदोष मुक्तता केली.

**७.** त्यानंतर सुमारे दोन महिने म्हणजेच अपील कालावधी पर्यंत जाबदार नं. १ यांनी अर्जदार नं. १ यांना व्यवस्थित नांदविले व त्यानंतर पुन्हा पुर्वीसारखे गैरकृत्य करुन अर्जदार नं. १ हिचा शारीरीक व मानसिक छळ करु लागले. सर्व जाबदार मिळून अर्जदार नं. १ यांना "तु आमची बदनामी केलीस, आम्हाला कोर्टाची पायरी चढणेस लावलेस" असे म्हणून मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. अर्जदार नं. १ या सदर गोष्टीकडे नेहमी कानाडोळा करीत असत. त्यानंतर जाबदार नं. १ हे जाबदार नं. २ ते ७ यांचे शिकवणीवरुन रोज पुर्वीप्रमाणे दारू पिऊन अर्जदार नं. १ यांच्या डोळ्यांना इजा करुन बेदम मारहाण करुन लागले. सदरचा त्रास फारच असह्य होत असल्याने अर्जदार नं.१ यांनी त्यांचे वडील व भावास बोलावून घेतले. दि. ०३/०९/२०२४ रोजी त्यांनी घडलेल्या घटनेची व अर्जदार यांचेवर पुन्हा पुर्वीसारखे होत असलेले जाचहठ व छळाची माहिती दिली. त्यानंतर जाबदार नं. १ हे घरी आले व काहीही बोलून न देता सर्वांच्या

समोर " तु तुझ्या वडीलांना इथे का बोलावलेस" असे बोलून जाबदार नं. १ व २ यांनी अर्जदार नं.१ यांना सर्वासमोर माराहाण करुन राहत्या घरातून बाहेर हाकलून काढले. तसेच अर्जदार नं.१ हिला व त्यांच्या वडीलांना "इथे परत आला तर ठार मारुन टाकेन व तुमच्या मुलीला ताबडतोब येथून घेऊन जा" असे म्हणून जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर अर्जदार नं.१ यांनी सदर घटनेची पोलिस स्टेशनमध्ये फिर्याद दिली व त्याप्रमाणे पोलीसांनी जाबदार नं. १ व २ यांचे विरुध्द एन.सी.आर नं. ५४८/२०२४ अन्वये बी.एन.एस.एस. २०२३ चे कलम ११५ (२), ३५१(२), ३५२ प्रमाणे गुन्हा नोंद केला. त्यानंतर अर्जदार या आपल्या मुलासहित, वडीलासोबत माहेरी निघून आल्या. तेव्हापासुन अर्जदार ही आपल्या आई–वडिलांकडे मिरज येथेच राहण्यास आहे. त्यानंतर जाबदारांनी अर्जदार यांची कोणतीही विचारपुस केली नाही.

८. जाबदार यांच्या सततच्या छळ जाचामुळे व जुलुमामुळे अर्जदार हिला फार मोठा मानसीक धक्का बसला आहे. अर्जदार ही माहेरी राहण्यास आल्यापासुन जाबदार नं.१ याने तिची विचारपुस केलेली नाही अगर तिचे पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी स्विकारलेली नाही. जाबदार नं. १ हा अर्जदार हिस नांदवित नसल्याने अर्जदार ही सध्या तिच्या आई–वडिलांचे घरी नाईलाजास्तव रहात आहे. तिचे पुरेसे शिक्षण झालेले नसल्याने तिला कोणताही कामधंदा नाही. तसेच जाबदारांनी अर्जदार हिच्या जीवनाचे बरे–वाईट करण्याची धमकी दिलेली असल्याने अर्जदार हिचे जीवास धोका निर्माण झालेला आहे. अर्जदार हिला कोणतेही उदरनिर्वाह व उत्पन्नाचे साधन नाही. अशाप्रकारे अर्जदार ही पुर्ण परावलंबी झालेली असुन तिला आपल्या आई–वडिलांवर अवलंबुन रहावे लागत आहे. अर्जदार यांची उदरनिर्वाहाची संपुर्ण जबाबदारी जाबदार नं.१ यांची असुन आजअखेर जाबदार नं.१ याने अर्जदार यांची कोणतीही चौकशी केलेली नाही. अशाप्रकारे जाबदार नं.१ याने अर्जदार यांचा जाणुन–बुजुन त्याग केलेला आहे व अर्जदार हिला संसारसुखापासुन वंचीत ठेवलेले आहे.

**९.** जाबदार नं. १ हे इचलकरंजी येथील नामांकीत ममता बेकरीमध्ये चांगल्या पदावर नोकरीस असून व त्यापासुन त्यांना र.रु. २०,०००/– मासीक व सन्न मिळतो. तसेच जाबदार यांची कबनूर येथे ०.५२.०० चौ.मी क्षेत्राची वडीलार्जीत बिनशेती मिळकत असुन जाबदार नं. १ यांचे हिस्सेस चालू बाजारभाव र.रु. १५,००,०००/–होते. अर्जदार नं. १ ही अर्धशिक्षीत व अशक्त महिला आहे. जाबदार नं. १ याने अर्जदाराची पोटपाण्याची, औषधपाण्याची व निवाऱ्याची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. जाबदार यांची अर्जदार यांना दरमहा रुपये १७,०००/– पोटगी देणेची ऐपत आहे व ती त्यांची जबाबदारी देखील आहे. सबब अर्जदार यांना जाबदार यांनी दरमहा र.रु १७,०००/– पोटगी द्यावी असा हुकुम होवुन मिळणेकरिता तसेच जाबदार यांनी अर्जदार यांचे जीवास काहीही बरे–वाईट करु नये व त्यापासुन त्यांना संरक्षण मिळावे तसेच अर्जदार यांना स्वतंत्र निवाऱ्याकरिता सोय करुन देणेकरिता आदेश व्हावा व जाबदार यांनी अर्जदार यांना दिलेल्या मानसीक व शारिरीक त्रासाबद्दल नुकसान भरपाई मिळावी याकरिता प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

**१०.** जाबदार यांना नोटीस मिळूनही त्यांनी प्रस्तुत प्रकरणी हजर राहून आपले म्हणणे सादर केले नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरण जाबदार यांचेविरुध्द एकतर्फा चालविण्यात आले व तसा आदेश नि.१ वर पारित करण्यात आला.

**११.** अर्जदारांचा लेखी व कागदोपत्री पुरावा तसेच तिच्या विद्वान वकीलांचा लेखी युक्तीवाद वाचून व तोंडी युक्तीवाद ऐकुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ आले आहेत व त्यावर मी खालील कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदवित आहे –

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार सिध्द करते काय की, जाबदार यांनी तिचा कथीत शारिरिक व मानसिक कौटुंबिक हिंसाचार | होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | केला? | |
| २. | अर्जदार ही तिला जाबदारांपासून संरक्षण अधिकारीमार्फत संरक्षण देणे गरजेचे आहे हे शाबीत करतात का ? | होकारार्थी |
| ३. | अर्जदार जाबदारांकडून मागणी केल्याप्रमाणे पोटगी व निर्वाह भत्ता मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ४. | अर्जदार ही जाबदारांकडून मागणी केल्याप्रमाणे निवा–यासाठी आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| ५. | अर्जदार मागणी केल्याप्रमाणे जाबदारांकडून नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| ६. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## : का र ण मि मां सा :

**१२.** अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचार सिध्द करण्यासाठी तिचे स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.१४ वर दाखल केलेले आहे. अर्जदार हिने तिचे शपथपत्रात अर्जातील सर्व मजकूर व तथ्यांची पुनरावृत्ती केलेली आहे. प्रस्तुतचे प्रकरण एकतर्फा चालविण्यात आल्यामुळे अर्जदार हिचा जाबदार यांचेतर्फे उलटतपास घेण्यात आलेला नाही.

**१३.** अर्जदार हिने तिच्या कथनाच्या पृष्ठयर्थ अर्जदार व जाबदार यांच्या विवाहनाची पत्रीका **(नि.१५)**, तसेच जाबदारविरुध्द दाखल केलेल्या एन.सी.आर. च्या प्रती **(नि.१६ ते १८)** इ.कागदपत्रे दाखल केली आहेत.

**मुद्दा क्र.१ बाबत –**

**१४.** अर्जदार हिने तिचे अर्जात तिचा विवाह जाबदार क्र.१ सोबत झाल्याचे सांगितलेले आहे व तसेच पुराव्याचे शपथपत्रात सुध्दा कथन केलेले आहे. अर्जदार व जाबदार क्र.१ यांचा विवाह एन.बी.हॉल, कमाल मस्जीदसमोर, बुधवार पेठ, मिरज येथे झालेला आहे. अर्जदार हिचा जाबदार क्र.१ याचेसोबत विवाह झाल्याबाबतचा व त्यांना अर्जदार क्र.२ व ३ ही अपत्ये झाल्याबाबतचा तोंडी व कागदोपत्री पुरावा हा विनाआव्हानीत राहिलेला आहे. वरील सर्व बाबींचा व दाखल पुराव्याचा विचार करता अर्जदार व जाबदार क्र.१ यांचा विवाह झाल्याचे सिध्द होते.

**१५.** अर्जदार हिने तिच्या अर्जात विविध कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना नमुद केलेल्या आहेत. अर्जदार हिच्या प्रतिज्ञापत्रातील कथनांची उलट तपासणी न घेतल्यामुळे ते विनाआव्हानित राहिले आहे. अर्जदार हिने विविध कौटुंबिक हिंसाचाराचा उल्लेख तिच्या प्रतिज्ञापत्रात केलेला आहे. अर्जदार हिने जाबदारांचेविरुध्द कौटुंबिक छळाचे आरोप विनाकारण करण्याचे कोणतेही कारण दिसत नाही. जाबदार यांनी याकामी हजर राहून त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यावरुन त्यांनी अर्जदाराकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे असे दिसते. अर्जदार ही तिच्या माहेरी रहात आहे. जाबदार क्र.१ याची अर्जदार ही पत्नी असल्याने व त्यांना अर्जदार क्र.२ व ३ ही अपत्ये असल्याने त्यांचा सांभाळ करणे ही जाबदार यांची नैतीक जबाबदारी आहे. जाबदार हे अर्जदारांच्याप्रती असलेले कर्तव्य पार पाडत नाही असे दिसते व हा निष्काळजीपणा देखील एक प्रकारचा कौटुंबिक हिंसाचारच आहे. अशा प्रकारे अर्जदार हिने दाखल केलेला पुरावा मान्य करणे गरजेचे आहे. जाबदार यांनी अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या पालनपोषणाची जबाबदारी स्विकारल्याबाबत कोणताही पुरावा संधी देवूनही दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्जदारावर आर्थिक हिंसाचार होत आहे असे दिसते. या सर्व कारणांचा विचार करता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत –**

**१६.** अर्जदार ही जाबदारांकडून सरंक्षण मिळविण्यास पात्र आहे काय याबाबत विचार करता अर्जदार हिने तिच्यावर झालेल्या शारीरिक, मानसिक तसेच आर्थिक छळाबाबत सविस्तर कथन केले आहे. सदर कथनास कोणताही प्रतिवाद जाबदारांकडून करण्यात आलेला नाही. तसेच अर्जदार हिने दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन व तिच्या सरतपासातील मजकूरावरुन असे स्पष्ट होते की, अर्जदार ही सध्या माहेरी रहात असून तिच्या जिवीतास व सुरक्षिततेस धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे अर्जदार हिला सरंक्षण देणे आवश्यक आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.३ बाबत –**

**१७.** अर्जदार ही निर्वाह भत्ता मिळण्यास पात्र आहे काय याबाबत विचार करता अर्जदार क्र.१ हिच्यावर अर्जदार क्र.२ व ३ या अल्पवयीन मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी आहे. अर्जदार ही स्वतः कोणत्याही आर्थिक उत्पन्नाच्या साधनाशिवाय पुर्णपणे परावलंबी असल्याचे दिसून येते. जाबदार क्र.१ हा खाजगी नोकरी करीत असून त्याला निश्चीत उत्पनाचे साधन असल्याचे शपथेवर अर्जदार क्र.१ हिने कथन केले आहे. सदर पुरावा हा विनाआव्हानीत राहिला आहे. पोटगी निश्चीत करताना ती वाजवी व परिस्थितीनुरुप असणे आवश्यक आहे व ती जाबदार यांच्यावर अत्याधीक भार टाकणारी नसावी. सर्व बाबींचा एकत्रीत विचार करता अर्जदार क्र.१ हिला दरमहा रु.३,०००/– व अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु.२,०००/– अशी पोटगी देणे न्यायोचीत होणार आहे. त्यामुळे अर्जदारांची मागणी अंशतः मंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.३ चे उत्तर अंशतः होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.४ बाबत –**

**१८.** अर्जदार ही स्वतंत्र निवा–याचा आदेश मिळण्यास पात्र आहे काय याबाबत विचार करता, अर्जदार ही सध्या माहेरी असल्याचे दिसते. प्रस्तुत प्रकरणात स्वतंत्र

निवा–यासंबंधी ठोस व आवश्यक परिस्थिती दर्शविणारा पुरावा दिसून येत नाही. तसेच, अर्जदार हिने जाबदार यांच्या घरजागा मिळकतीबाबत कुठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अशा परिस्थितीत अर्जदार हिच्या निवा–याबाबत आदेशीत करणे योग्य होणार नाही. सबब, मी मुद्दा क्र. ४ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ बाबत –</u>**

**१९.** अर्जदार हिने तिला नुकसान भरपाई देण्याची मागणी केलेली आहे. अर्जदाराचे झालेले कथीत नुकसानाचे मोजमाप करण्यासारखा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. जाबदार यांनी अर्जदारांचे पालनपोषण औधषोपचार या बाबींची टाळाटाळ केलेली आहे. जाबदार यांनी अर्जदाराना मानसिक त्रास व भावनिक दुःख दिलेले आहे. हे कृत्य मानसिक पीडा देणारे नक्कीच आहे. तसेच अर्जदारास सदरचे प्रकरण दाखल करण्यासाठी खर्च झालेला आहे. जाबदार नं.१ याने पती व पिता या नात्याने कोणतेही आर्थीक सहाय्य केल्याचे दिसून येत नाही. या सर्व बाबींचा विचार करता, अर्जदार ही नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांचे जीवनमान, उत्पन्न व प्रस्तुतचे प्रकरण दाखल करण्यासाठी अंदाजे झालेल्या खर्चाचा विचार करता अर्जदारास रक्कम रुपये १०,०००/– नुकसान भरपाई मिळणे न्यायोचीत वाटते. सबब, मुद्दा क्र.५ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.६ बाबत</u> –**

**२०.** वरील सर्व मुद्दयांच्या निष्कर्षांच्या कारणमिमांसे सहित विचार करता, सदरचा अर्ज अंशतः मंजूर करुन न्यायाच्या दृष्टीने मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| २ | जाबदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला दरमहा रु.३,०००/- व अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु.२,०००/- पोटगी म्हणून मुळ अर्ज दाखल तारखेपासून द्यावे. |
| ३ | जाबदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला नुकसान भरपाई म्हणून रक्कम रुपये १०,०००/- आजपासून एक महिन्याचे आत द्यावेत. |
| ४ | जाबदार यांनी अर्जदार क्र.१ ते ३ यांच्यावर कोणत्याही प्रकारचा शारीरिक, मानसिक अथवा आर्थिक छळ करु नये, तसेच अर्जदारांच्या जिवीतास किंवा सुरक्षिततेस कोणताही धोका निर्माण करु नये असा सरंक्षण आदेश देण्यात येतो. |
| ५ | सदर न्यायनिर्णयाची नक्कल अर्जदार, जाबदार यांना कलम २४ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ प्रमाणे मोफत देण्यात यावी. |
| ६ | आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सदर न्यायनिर्णयाची प्रत सरंक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी. |

POONAM DIPAK GAIKWAD
Digitally signed by POONAM DIPAK GAIKWAD
Date: 2026.03.30 11:17:35 +0530

**ठिकाण – मिरज.** **(श्रीमती पी. डी. गायकवाड)**

**दिनांक – २५/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, न्यायालय क्र.३,**

**मिरज.**